जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 APR 2024
पुढारी



# शिवाजी विद्यापीठाच्या १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या आहेत. या परीक्षेसाठी ३६९८ विद्यार्थ्यांपैकी ४९३ विद्यार्थी अनुपस्थित होते. विविध १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले असून ६४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. दि. १६ एप्रिल, २०२४ रोजी सदर पथकाकडून सांगली-९, कोल्हापूर-१ अशी दोन जिल्ह्यांतून एकूण १० गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 APR 2024
लोकमत

# न्यू कॉलेजमध्ये उद्यापासून कार्यशाळा

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे व आयुका यांच्यातर्फे न्यू कॉलेज येथे शुक्रवार, दि. १९ आणि शनिवार, दि. २० एप्रिल रोजी खगोलशास्त्र, विज्ञान व समाज या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी दिली. उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी आयुकाचे शास्त्रज्ञ डॉ. ध्रुबा सायकिया आणि त्यांचे सहकारी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातून सुमारे ५० खगोलप्रेमी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.